**<u>वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>**
(पारीत केल्याची तारीख **२८.११.२०१८**)

**०१.** वादी तर्फे अखत्यारी व विधीज्ञ श्री. एम. डी. पाटील हजर. सर्व प्रतिवादी गैरहजर. प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एच्. ए. वाघ हजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांना दावा समन्स नोंदणीकृत टपालाने बजावणी होवून पोष्टाची पावती अनुक्रमे **<u>नि.क्र.४२ व ४३</u>** ची दिनांक **०६.०८.२०१८** रोजी न्यायालयात प्राप्त झाली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ तर्फे विधीज्ञ श्री. एच्. ए. वाघ दिनांक **०५.१०.२०१८** रोजी हजर झाले आहेत.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१</u>** नुसार मुदतीत कैफियत आणि अर्ज **<u>नि.क्र.०५</u>** वर म्हणणे दाखल केले नाही. म्हणून त्यांच्याविरुद्ध दावा व अर्ज **<u>नि.क्र.०५</u>** ''विना कैफियत व विना म्हणणे'' चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी मुदतीत कैफियत व अर्ज <u>नि.क्र.०५</u> वर म्हणणे दाखल केले नाही म्हणून त्यांच्याविरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा व अर्ज <u>नि.क्र.०५</u> ''विना कैफियत व विना म्हणणे'' चालवण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड**

**स्थळ : रोहा**
**दिनांक : २८.११.२०१८**